TYBMM-JOURO
SEM-V Reporting

**QP Code : DE-1869**

(२ तास) [ एकूण गुण : ६०

सूचना : (१) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
(२) इंग्रजी प्रश्नपत्रिका मूळ प्रश्नपत्रिका आहे.

१. खालील उतारा हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या भारतीय संसदेतील भाषणाचा आहे. त्यामधील तथ्यांची पुनर्रचना करून २५० शब्दात लिहा. बातमीमूल्य आणि महत्त्वाच्या तत्त्वांची काळजी घ्या:- १५

माननीय राष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभा तसेच राज्यसभेचे सभासद आणि सर्व भारतीय नागरिकांनी.

गेल्या तीन दिवसांपासून मी आणि माझी पत्नी मिशेल आम्ही दोघेही भारतीय लोक तसेच भारताचे सौंदर्य आणि सामर्थ्याचा अनुभव घेत आहोत. हुमायुचे साम्राज्य ते आधुनिक तंत्रज्ञान यांचा मिलाफ भारतीय शेतकरी तसेच महिला, जे भारतीय समाज व्यवस्थेच्या पाठीचा कणा आहेत यांना अधिक सक्षम करीत आहे. भारतीय विद्यार्थी जे आधुनिक भारताचा आराखडा तयार करणार आहेत, तसेच राजकीय पुढारी यांच्यामुळे भारत आज इथपर्यंत येऊन पोहोचला आहे.

ज्या ज्या ठिकाणी आम्ही भेट दिली तिथे आमचे मोठ्या आदराने स्वागत आणि सत्कार झाला आणि हीच भारत आणि भारतीयांची जगभर ओळख आहे. भारतीय नागरिक यांचे मी माझ्यातर्फे, मिशेलतर्फे आणि अमेरिकन नागरिकांतर्फे आभार मानतो.

खूप खूप आभार!

आशिया खंडात तसेच जगभरात भारत हा देश फक्त विकसनशिल राष्ट्र नसून विकसित राष्ट्र झाला आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

भविष्याला आकार देण्यात भारतीयांचे तसेच भारतीय इतिहासाचे फार महत्त्वाचे योगदान आहे, ज्याचा मला आदर आहे. भारतामुळे मानवी शरीराची गुंतागुंत सोडवणे शक्य झाले. आदमच्या माहितीच्या युगात भारताने लावलेल्या विविध शोधांचे फार मोलाचे योगदान आहे ज्यात 'शुन्य'चा शोध याचा समावेश आहे.

भारताने फक्त आपल्या बुद्धीला चालना दिली नसून आपल्या कल्पनांना सुद्धा एक व्यापक स्वरूप प्रदान केले आहे.

निडर आणि ताठ मानेने जगायला शिकविले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी ज्यांनी प्रेम आणि न्याय याचा संदेश दिला. त्यांचा हा देश. माझ्यासाठी आणि मिशेलसाठी ही भेट फार महत्त्वाची आणि अविस्मरणीय ठरणार आहे.

माझ्या कारकिर्दीत मी नेहमी शहरी-गरीब लोकांचे प्रतिनिधित्व केले आहे. गांधीजींच्या विचाराने जगभरामध्ये जे बदल घडवून आणलेत त्यातून मला एक विशेष प्रेरणा मिळालेली आहे.

ज्याप्रमाणे त्यांनी भारतीयांना ध्येय गाठण्यासाठी प्रोत्साहित केले त्याचप्रमाणे माझ्या देशातील मार्टिन ल्यूथर किंगसाठी समतेचे प्रेरणा स्थानही तेच होते.

२. अचूकता, समतोल आणि स्पष्टता यांना बातमीदारीचे मूलभूत घटक म्हटले आहे. तुमच्या बातमीमध्ये तुम्ही याचा समावेश कसा कराल हे उदाहरणासहीत विशद करा. १५

किंवा

२. २६/११ च्या मुंबईवरील अतिरेकी हल्याच्या वार्तांकनासाठी माध्यमांवर का टिका केली जाते? अशा घटनांचे वार्तांकन करताना कोणत्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे? १५

३. (अ) एखाद्या राजकीय घटनेचे वार्तांकन दोन वेगवेगळ्या शिरोभागासहीत कसे करता येईल हे उदाहरणहीत स्पष्ट करा. ८

३. (ब) गुन्हेगारी संबंधीचे वार्तांकन एखाद्या विशिष्ट घटनेचा संदर्भ देऊन स्पष्ट करा. ७

किंवा

३. शोध पत्रकारितेने शासन व्यवस्थेमध्ये बदल घडविले आहे. सद्य काळातील पत्रकाराने उघडकीस आणलेल्या कोणत्याही दोन घोटाळ्यांचा परामर्श घेऊन हे "विधान" स्पष्ट करा. १५

४. टिपा लिहा:- १५

(अ) अॅट्रीब्युशन

(ब) घटना स्थळी केलेल्या बातमीदारीची आव्हाने

(क) पीत पत्रकारितेचा उगम

(ड) चर्मोद्योग घोटाळा

(इ) तहलका घोटाळा.

**Con. 4940-14.**

munotes.in

Scanned by CamScanner